दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १४० वा बुधवार दि.१३ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# निवासी आमदार हवा की, प्रवासी आमदार

## भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांचा मतदारांना सवाल



लातूर / प्रतिनिधी : – निवडून गेल्यानंतर काँग्रेसचे आमदार पुन्हा कधी भेटले का? तुमची कोणती कामे केली का? विकास कामांना निधी दिला का? ते कुठे राहतात असे विविध प्रश्न उपस्थित करून मुंबईत राहणाऱ्या आमदाराचे हे पार्सल परत मुंबईला पाठवण्याची वेळ आली आहे. प्रवासी आमदाराला धडा शिकवून निवासी आमदाराला साथ द्यावी आशीर्वाद द्यावेत आणि काम करण्याची संधी द्यावी असे आव्हान भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे चिकलठाणा, बामणी, ममदापूर, भडी, रमजानपूर, भातांगळी, भाडगाव, उमरगा, बोरी, भातखेडा यासह अनेक गावचा प्रचार दौरा केला ठीक ठिकाणी मतदारांनी उत्स्फूर्तपणे स्वागत करून प्रतिसाद दिला समर्थन दर्शविले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, गोविंद नरहरी प्रताप पाटील, राम बंडापल्ले, मारुती शिंदे, पांडुरंग बालवाड, संजय ठाकूर, रुपेश काळे, आदिनाथ मुळे, बापूराव चांमले, रुपेश थोरमोठे, सचिन साबदे, विजयकुमार मलवाड, हनुमंत गव्हाणे, सतीश बिराजदार, राम बंडापल्ले, अशोक बिराजदार श्रीकृष्ण मोटेगावकर, लिंबराज बुळंगे, व्यंकट जटाळ, पुंडलिक बेंबडे, अकबर शेख, राम बेंद्रे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

ठीक ठिकाणच्या प्रचार बैठकीत बोलताना महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब पंतप्रधान झाल्यापासून आणि राज्यात महायुतीचे शासन सत्तेवर आल्यापासून गोरगरीब अठरापगड जाती धर्मांना न्याय देण्यासाठी मोफत अन्नधान्य, शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण, शेतीला मोफत वीज पुरवठा यासह विविध योजना सुरू केल्या विकासापासून कोसोदूर असणाऱ्या घटकांना गोरगरीब आठरापगड जाती धर्मातील माणसांना विकासाच्या प्रवाहात आणले. आज प्रत्येक कुटुंबाला कुठल्या ना कुठल्या योजनेचा लाभ मिळाला आहे.

तीन–साडेतीन वर्षात कठ्यावधी रुपयाचा निधी मतदार संघातील गावागावात मंजूर करून आणला. साडेतीनशेहून अधिक मंदिराचा जिर्णो द्धार करण्याचे भाग्य मला लाभले असून निवडून गेल्यानंतर काँग्रेसचा आमदार पुन्हा कधी गावात आला का त्यांनी काय विकासाची कामे केली असा प्रश्न उपस्थित करून माझ्या माध्यमातून आणि भाजपा शासनाच्या माध्यमातून मंजूर झालेल्या योजनाची श्रेय घेण्याचा केविलवाणी प्रयत्न मात्र करीत आहेत. हे आमदार महाशय लातूरचे आहेत की, मुंबईचे फिरायला गेल्याप्रमाणे बॅग भरून मतदार संघात येतात असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्यावेळी मतदार संघाला विकत घेण्याचे पाप केले. उसाचे राजकारण करून शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला जात आहे देशमुखचा एकदा टांगा पलटी करावाच लागेल त्याशिवाय शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल होणार नाही आणि मतदार संघाच्या विकासाला गती प्राप्त होणार नाही काँग्रेसच्या आमदाराची पंधरा वर्षे पाहिली आता फक्त मला पाच वर्षे संधी देऊन पहा मतदार संघाचा चेहरा आणि मोहरा बदलून दाखविल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा येत्या २० नोव्हेंबर रोजी कमळ चिन्हा समोरील बटन दाबून काम करण्याची मला संधी द्यावी असे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

पराभव होणार हे काँग्रेसवाल्यांना कळून चुकले आहे त्यामुळे मतदारांना पैशासह वेगवेगळी अमिषा दाखवली जात आहेत पैशाच्या जोरावर विजय मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत मात्र हे आता कदापि शक्य नाही काँग्रेसवाले पैसे देत असतील तर जरूर घ्या ते पैसे बाभळगावचे सोयाबीन विकून देत नाहीत तुमच्या आमच्या उस बिलातून केलेल्या कपातीचा भ्रष्ट पैसा आहे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भातांगळीच्या गद्दाराला ताटात घेऊन जेवलो माझी चूक झाली खाल्लेल्या ताटातच घाण केली या गद्दाराची औकात दाखवून देण्यासाठी माझ्या सहकाऱ्यांनी भातांगळी गावात कमळाच्या चिन्हाला प्रचंड मताधिक्य मिळवून द्यावे असेही आ. कराड यांनी बोलून दाखविले.

## न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीची लातुरात उणीव – डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर



लातूर/प्रतिनिधी :– सर्वसामान्य जनतेला त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीची लातुरात उणीव आहे,असे प्रतिपादन भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

डॉ.अर्चनाताई पाटील यांनी लातूर येथील न्यायालय परिसरात वकील मंडळींची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी अर्चनाताई पाटील बोलत होत्या. ताईंनी यावेळी वकील मंडळींच्या अडी–अडचणी जानून घेतल्या.वकील बांधवांच्यावतीने सत्कार करुन त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

वकील बांधवांशी संवाद साधताना डॉ.अर्चनाताई म्हणाल्या की,लातूर विधानसभेची लढाई ही साधी नाही.ही लढाई धनशक्ती विरुध्द जनशक्तीची आहे.माझ्या सोबत जनशक्ती आहे.जनशक्तीच्या बळावर प्रत्येक आव्हानाचा सामना करत आपण जिंकणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या की,आपल्याशी संवाद साधताना सर्वसामान्यांना त्यांचा हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आसणाऱ्या वकिलांच्या हक्कासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीची उणीव वारंवार जाणवत आहे. लातूरकरांच्या हक्काचा विकास त्यांना मिळवून देण्यासाठी मी मैदानात उतरले आहे.आपले सर्वांचे सहकार्य व जनशक्तीची साथ मला मिळाली आहे.त्यामुळे मी प्रत्येक आव्हानाचा सामना करत लढाई जिंकणार असल्याचा विश्वास डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी व्यक्त केला.

प्रारंभी डॉ.अर्चनातइ पाटील यांनी न्यायालय परिसरात फिरून सर्व वकील बांधवांची भेट घेतली.यावेळी वकिलांच्या वतीने ठिकठिकाणी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी वकिलांसाठी बैठक व्यवथा,सुसज्ञ ग्रंथालय तसेच अशिलांसाठी विविध सोयी– सुविधा योग्य प्रमाणात उपलब्ध नसल्याचे सांगुन आगामी काळात न्यायालय परिसरात विविध सोयी–सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी बोलताना ड. प्रदीपसिंह गंगणे यांनी निवडणूकीतील उमेदवार हा या परिसराची जाण असणारा तसेच विकासाची दृष्टी असणारा असायला पाहिजे.सुदैवाने भाजपा महायुतीला असा उमेदवार मिळाला आहे.त्यांच्या नेतृत्वात लातूरच्या विकासाचा अनुशेष भरून निघणार आहे. मतदारांनी ताईंना विक्रमी मतांनी निवडून द्यावे,असे आवाहन केले.

यावेळी ड.जगन्नाथ चित्ताडे,ड.उदय गवारे,ड. प्रदीप गंगणे,ड. झडके,ड. विजय जाधव,ड.उमेश पाटील, ड.दयानंद मिटकरी,ड. शिवपुरकर,ड.कोदळे,ड. संतोष गिल्डा,ड.सुहास बेद्रे, ड.शैलेश पतंगे,ड.गवारे मॅडम,ड. गोरे मॅडम,ड.स्वाती तोडकरी आदी मंडळी उपस्थित होती.

## काँग्रेसचे स्टार प्रचारक अमित देशमुख यांच्या प्रचारसभांना मराठवाडासह राज्यभरात मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



लातूर / प्रतिनीधी :– महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख निवडणूक काळात दिवसभरात संपूर्ण राज्यभर ठिकठिकाणी प्रचार सभा घेऊन सायंकाळी लातूर येथे पोहचत असत. घार हिंडे आकाशी चित्त तिचे पिलापाशी या म्हणीच्या उक्तीप्रमाणे ते लातूरकरांशी वागत असत त्यांच्या लोकसेवेचा वसा सांभाळणारे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुखही त्याच भुमिकेत वावरत आहेत. दिवसभ्सरात राज्यात प्रचार दौरे करुन सायंकाळी ते लातूरमध्ये पोहचून न थकता येथे प्रचारफेरी आणि प्रचार बैठका घेत आहेत. माजी मुख्यमंत्री नेहमीच काँग्रेस पक्षाचे स्टार प्रचारक असत, राज्याचे प्रचार प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबादारी सांभळली. त्यांच्या प्रमाणेच मंत्री आमदार अमित देशमुख यांच्यावर काँग्रेस पक्षाने स्टार प्रचारकाची जबाबदारी सोपवली आहे. या जबाबदारीला न्याय देत ते सदया राज्यभरात प्रचार सभा गाजवत आहेत. लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार असलेले अमित विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्हयात, मराठवाडयात आणि राज्यभरात आजवर अनेक सभा घेतल्या आहेत. फक्त काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या नव्हे तर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उमेदवारांसाठीही ते प्रचार सभा घेत आहेत. लातूर येथे स्वत: व लातूर ग्रामिणचे आमदार धिरज देशमुख यांच्या प्रचाराचा शुभारंभ केल्या नंतर त्यांनी अहमदपूर येथे ५ नोव्हेंबर रोजी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विनायकराव पाटील यांच्यासाठी तर दुपारी औसा विधानसभा मतदार संघातील शिवसेना उमेदवार दिनकरराव माने यांच्यासाठी प्रचार सभा घेतल्या. सायंकाळी त्यांनी स्वतासाठी लातूरात सभा घेतल्या ६ नोव्हेबर रोजी सकाळी परभणी जिल्हयात पाथरी मतदार संघात सोनपेठ येथे काँग्रेस उमेदवार सुरेश वरपूडकर यांच्यासाठी दुपारी नांदेड जिल्हयातील बिलोली मतदार संघातील काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवृत्ती कांबळे यांच्यासाठी प्रचार सभा घेतली. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी तुळजापूर मतदारसंघात काँग्रेस उमेदवार धिरज पाटील यांच्यासाठी तुळजापूर येथे दुपारी उमरगा मतदारसंघात शिवसेना उमेदवार प्रविण स्वामी यांच्यासाठी ८ नोव्हेंबर रोजी सकाळी निलंगा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे उमेदवार अभय सांळुके यांच्यासाठी तर संध्याकाळी धिरज देयामुख यांच्यासाठी रेणापूर येथे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह प्रचार सभा घेतली.

## काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची आज लातूरात सभा

लातूर / प्रतिनिधी :– विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. निवडणूक प्रचारासाठी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे आज (दि.१३) लातूर शहरात येणार आहेत. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस– महाविकास आघाडीचे लातूर शहर विधानसभा मतदार संघाचे उमेदवार माजी मंत्री अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामिण धिरज विलासराव देशमुख, अहमदपूर मतदारसंघाचे विनायकराव पाटील, उदगीर मतदारसंघाचे सुधाकर भालेराव, औसा मतदार संघाचे दिनकर माने यांच्या प्रचारार्थ खरगे यांच्या विशाल सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा बुधवारी (दि.१३) सकाळी लातूर शहरातील दयानंद महाविद्यालयाच्यामैदानावर सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सभेस महाविकास आघाडीचे राज्य पातळीवरील प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## महायुतीचे उमेदवार ना.संजय बनसोडे हे पन्नास हजाराच्या मताधिक्याने निवडून येतील

## भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे युवा मोर्चा ना.संजय बनसोडे यांच्या विजयासाठी सज्ज

उदगीर / प्रतिनिधी :– विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. संजय बनसोडे यांच्या विजयासाठी भारतीय जनता युवा मोर्चा सज्ञ झाला असून ना.संजय बनसोडे यांना प्रचंड मतांनी निवडून आणण्यासाठी आमचे युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचंड मेहनत करत असुन ना.संजय बनसोडे यांनी गेल्या पाच वर्षात केलेले कार्य जनसामान्यांपर्यंत पोहचवुन त्यांना मतदार संघातून पन्नास हजारापेक्षा जास्त मताधिक्याने निवडून आणण्यासाठी आम्ही काम करत असल्याचे मत भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे यांनी केले. ते उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना.संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ गावभेट दौरा निमित्त उदगीर तालुक्यातील कोदळी येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, बसवराज पाटील कौळखेडकर,चंद्रकांत वैजापुरे, भरत चामले, प्रवीण भोळे, शिवशंकर धुप्पे, ब्रम्हाजी केंद्रे, प्रकाश राठोड, श्रीधर राठोड, धर्मपाल नादरगे, धनराज बिरादार, रमेश शेरीकर, डॉ.चंद्रकांत कोठारे, सतिश सुळे महाराज, अजित राठोड, गोपाळ पाटील, शिवशंकर पांडे, राजीव वाघे, लहु कांबळे, प्रकाश सुतार, प्रकाश पाटील, शंकर जाधव, शिवाजी डावकरे, अरुण पटणे, गिरीधर गडीतकर, विशाल सुतार, व्यंकट सुर्यवंशी, वामन जाधव, आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना निडवदे म्हणाले की, मागच्या अडीच वर्षाच्या कालखंडामध्ये उदगीर व जळकोट तालुक्याचा चेहरा मोहरा ना.बनसोडे यांनी बदलला, उदगीर विधानसभेमध्ये अनेक वर्षांमध्ये जे झालं नाही ते काम ना. बनसोडे यांनी केले आहे. प्रत्येक समाजाला न्याय देण्याची भूमिका संजय बनसोडे यांनी पार पाडली. मतदार संघाच्या विकासाचा बॅकलॉग त्यांनी भरून काढला. त्यामध्ये ना.बनसोडे यांनी, तहसलीची इमारत, प्रशासकीय इमारत, पंचायत समितीची इमारत, मुस्लीम बांधवांसाठी शादीखाना, महापुरुषांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण व पुर्णाकृती पुतळे उभारणीसाठी निधी, छत्रपती शिवाजी महाराज महाप्रवेशव्दारासाठी निधी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय इमारत, पोलीस कर्मचारी निवासस्थान, महसूल कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी इमारत,पोलीस ठाण्याची इमारत, लिंगायत भवन, बौद्ध विहार, मुस्लिम शादीखाना, छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, मराठवाड्यातील एकमेव असे अंडरग्राऊंड ड्रेनेज ' भुमीगत गटार' ची मान्यता, पशुवैद्यकीय महाविद्यालय परिसरात विश्रामगृह, क्रीडांगणासाठी निधी, जळकोट येथे महावितरणचे कार्यकारी अभियंत्याचे कार्यालय, जळकोट येथे विविध इमारती व भवन, महापुरुषांच्या पुतळ्यासाठी व चौकाच्या सुशोभिकरणासाठी निधी, रस्ते, पाणी, विद्युत सबस्टेशन, एम.आय.डी.सी., आदी कामे करुन या भागाचा सर्वांगीण विकास केला आहेत. येत्या काळात उदगीरला जिल्हा करण्यासाठी ना.संजय बनसोडे यांनाच प्रचंड मतानी विजयी करावे असे आवाहन अमोल निडवदे यांनी केले आहे. यावेळी कोदळीसह, नागलगाव, नळगीर, चंडी, सुमठाणा आदी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# उत्तर कोरियाच्या आण्विक प्रकल्पांची डोकेदुखी

उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उन यांनी आपल्या हातात सत्तेचे केंद्रीकरण केले आहे आणि अणुशक्ती साधनांचे सामर्थ्य वाढविले आहे. त्यांच्या या वाढत्या उपद्रवाचा परिणाम केवळ दक्षिण कोरियावरच होतो असे नव्हे, तर जपानसारखे मोठे राष्ट्रही त्यांच्यामुळे संकटात आले आहे. त्यांच्याजवळ असलेल्या आण्विक सामर्थ्यावर नैतिकतेचे किती बंधन आहे, आचारसंहितेचे किती बंधन आहे आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या नियमांचे किती बंधन आहे, हा केवळ आता चिंतेचाच विषय नव्हे, तर चिंतनाचाही विषय झाला आहे.

उत्तर कोरियाने नव्या जगापुढे उभी केलेली ही आण्विक समस्यांची साखळी म्हणजे एक दीर्घकालीन डोकेदुखी ठरली आहे. २०२४ पर्यंत उत्तर कोरियाने ५० अण्वस्त्रे निर्माण केल्याचा अंदाज आहे. शिवाय दरवर्षी ६ ते ७ अण्वस्त्रे निर्मितीची क्षमता विखंडन प्रक्रियेतून निर्माण करण्याची त्यांची योजना आहे. रासायनिक व जैविक शस्त्रे आणि आण्विक सामग्रीचा एवढा मोठा संग्रह करून उत्तर कोरिया काय करणार आहे? २००३ मध्ये अण्वस्त्रबंदी करारातून उत्तर कोरिया मोकळा झाला आस्त्र त्यानंतर २००६ पासून त्याने सातत्याने अण्वस्त्र चाचणी प्रयोग सुरू केले. अमेरिका व युरोपीय राष्ट्रांनी अनेक आर्थिक निर्बंध लादले. तरीही किम जोंग यांना त्याचे काहीही नाही. पीपल्स रिपब्लिक ऑफ नॉर्थ कोरिया हे राज्य पूर्वी रशियाच्या आणि आता चीनच्या तालाने चालते. ९ ऑक्टोबर २००६ रोजी त्यांनी पहिली अण्वस्त्र चाचणी केली व त्यानंतर त्यांनी ६ वेळा सतत चाचण्या केल्या आहेत. त्यांनी २०१७ मध्ये पहिल्यांदा थर्मल न्यूक्लिअर चाचणी केली. त्यांच्या अणुचाचणीने ६.१ रिश्टर स्केल एवढ्या भूकंप क्षमतेची कंपने नोंदली गेली.

उत्तर कोरियाचा आण्विक कार्यक्रम १९५० पासून सुरू आहे. १९६२ मध्ये स्वसंरक्षणार्थ म्हणजे किल्ला मजबुतीसाठी उत्तर कोरियाने आण्विक प्रकल्पाला सुरुवात केली. शेवटी १९६३ मध्ये रशियन अभियंत्याच्या मदतीने उत्तर कोरियाने अणुभट्टी प्रकल्पास प्रारंभ केला आणि १९६५ मध्ये ती कार्यान्वित झाली. १९७४ मध्ये त्यातून ऊर्जानिर्मितीस प्रारंभ झाला. १९८९ मध्ये दुसरी अणुभट्टी सुरू झाली. त्याबरोबरच धातू प्रक्रिया आणि अणू प्रकल्पालाही गती दिली गेली. १९८० मध्ये उत्तर कोरियाने अण्वस्त्र निर्मिती प्रकल्पात पहिले पाऊल टाकले. पुढे युरेनियम निर्मिती आणि रूपांतरणाची प्रक्रिया विकसित करण्याची क्षमता त्यांनी साध्य केली. १९८३ मध्ये जागतिक नियामक संस्थेने त्यांची क्षमता मान्य केली. सुरक्षा परिषदेच्या नियमांचे पालन केले नाही, अशी उत्तर कोरियाविरुद्ध तक्रार करण्यात आली; पण त्याची पर्वा न करता त्यांनी आपला कार्यक्रम तसाच पुढे सुरू ठेवला. उत्तर कोरियावर अमेरिकेने निर्बंध लादले. क्लिंटन प्रशासनाच्या काळात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप झाले; परंतु १९९० मध्येच उत्तर कोरियाने पाकिस्तानकडून अण्वस्त्र निर्मितीसाठी मदत घेतल्याचे खुद्द पाकिस्तानने २००२ मध्ये नमूद केले. त्याला लिबियाचीही मदत होती. २००५ मध्ये आपल्याकडे अण्वस्त्रे आहेत, याची कबुली उत्तर कोरियाने दिली. हे कसे घडले? हे गुपित त्यांनी का ठेवले? अशी अनेक कोडी यातून निर्माण होतात. २००६ व २००७ मध्ये भूमिगत चाचणी यशस्वी केल्यानंतर २००९ मध्ये उत्तर कोरिया पूर्णपणे विकसित अण्वस्त्रधारी राष्ट्र बनले. ७ जानेवारी २०१६ रोजी त्यांनी हायड्रोजन बॉम्ब तयार केल्याचा दावा केला. २००६ ते २०२४ पर्यंत उत्तर कोरियाच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचा आलेख अभ्यासला असता, त्याची ही क्षमता सतत वाढत असल्याचे दिसून येते. जागतिक महासत्तेला आव्हान देताना उत्तर कोरिया आपला अणू कार्यक्रम काही सोडायला तयार नाही. अणुशक्तीसाठी आवश्यक विखंडन सामग्रीमध्ये प्लुटोनियम, युरेनियम यांचा समृद्ध साठा त्यांच्याकडे आहे. याचा शोध अनेक वैज्ञानिक व गुप्तचर संघटनांनी घेतला आहे. किम आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन या दोन हुकूमशहांच्या समान प्रवृत्तीमुळे होणारी मैत्री ही चिंताजनक आहे. त्यांनी आता आपले सैन्य पुतीन यांच्या मदतीसाठी पाठविले आहे. हे सैन्य तिथे गेल्यानंतर काय करेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे खुद्द झेलेन्स्की हेसुद्धा चिंताग्रस्त झाले आहेत आणि त्यांनी अमेरिका व नाटोकडे मदतीची याचना केली आहे. अशाप्रकारे या हुकूमशहाला कोण वेसण घालणार, हा खरा प्रश्न आहे. त्यांच्याजवळ असलेल्या आण्विक सामर्थ्यावर नैतिकतेचे किती बंधन आहे, आचारसंहितेचे किती बंधन आहे आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या नियमांचे किती बंधन आहे, हा केवळ आता चिंतेचाच विषय नव्हे, तर चिंतनाचाही विषय झाला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१९ मध्ये हानोई येथे उत्तर व दक्षिण कोरिया यांची एकत्र शिखर परिषद आयोजित केली होती. आता पुन्हा ट्रम्प निवडून आले आहेत, त्यामुळे हा संवाद पुढे चालू शकतो. यावरून हे स्पष्ट होते की, उत्तर कोरियातील डाव्या विचारसरणीच्या किम यांनी जर मनात आणले तर ते काहीही करू शकतील. त्यांनी आता रशियाच्या बाजूने युक्रेनविरुद्ध सैन्य पाठविले आहे. खुद्द अमेरिकेपर्यंत क्षेपणास्त्रे टाकण्याची त्यांची क्षमता आहे. त्यामुळे भविष्यकाळात ते काय करतील, कोणती पावले टाकतील, याकडे सार्या जगाचे लक्ष लागले आहे. अमेरिकेला त्यांना आव्हान द्यावयाचे आहे; पण रशिया व चीन यांनी थोडीशी समजूतदारपणाची भूमिका घेऊन त्यांची समजूत काढली, तर जगात शांतता नांदू शकेल आणि ट्रम्प यांच्या मध्यस्थीमुळे दोन्ही कोरियांच्या ऐक्याचे सूर पुन्हा उमटू लागतील; अन्यथा हा हुकूमशहा उत्तर कोरियाचे राजकारण तर बिकट करीतच आहे, परंतु जगाच्या राजकारणातही डोकेदुखी ठरू शकतो.

# महायुती आणि महाविकास आघाडी या कौरव पांडवांच्या लढाईत आपला मुख्य शत्रू कोण?

माणूस जन्म-मृत्यूच्या फे-यातून सुटका व्हावी म्हणून भक्तिमार्गाला लागतो. काहीजण पापातून मुक्त व्हावे म्हणून ईश्वरभक्ती करतात. मुळात पाप करायचेच कशाला हा प्रश्न आहे. परंतु माणसाची चंचल वृत्ती त्याला गप्प बसू देत नाही, मग मोहात पडणे वगैरे गोष्टी होतात. राजकीय व्यक्तींना भ्रष्टाचार नेहमीच खुणावत असतो. एकदा का तो भ्रष्टाचाराच्या मोहात पडला की त्यातून त्याची सुटका होणे कठीणच असते. मग त्यातून सुटका करून घेण्यासाठी तो धडपडत राहतो. राज्याचे नागरी आणि अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची सध्या अशीच अवस्था झाली आहे.

तपास यंत्रणांचा ससेमिरा चुकवण्यासाठी त्यांची धडपड सुरू झाली. ईडीच्या कारवाईतून मुक्त होण्यासाठी आपण भाजपबरोबर गेलो असे त्यांनी म्हटले आहे. मी ओबीसी असल्याने माझ्यावर कारवाई करण्यात आली, मी उच्चवर्णीय असतो तर ही कारवाई झाली नसती असेही ते म्हणाले. भुजबळ यांचे हे वक्तव्य हास्यास्पद आणि बालिश म्हणावे लागेल. कारण तुम्ही गुन्हाच केला नसता अथवा घोटाळा केला नसता तर ईडी तुमच्या मागे लागलीच नसती. 'कर नाही तर डर कशाला' असे म्हटले जाते. तुम्ही काही केले नसेल तर भीती कशाची? मूळ पक्ष सोडून आपण भाजपच्या आश्रयाला गेलो तर आपले सारे गुन्हे माफ होतील हे तुम्हाला माहीत होते. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपबरोबर महायुती सरकारमध्ये सहभागी झाल्याचा आनंद पक्षाच्या सर्वच नेत्यांना झाला होता.

कारण त्यामुळे ईडीपासून सुटका झाली. माझ्यासाठी तर ईडीपासून सुटका म्हणजे एकप्रकारे पुनर्जन्मच होता अशी कबुली भुजबळ यांनी दिली. दोन वर्षांपूर्वी अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचा हात सोडला आणि प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, सुनील तटकरे आदींसह भाजपच्या आश्रयाला गेले. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेसंदर्भात जे केले तेच अजित पवार यांनी राष्ट्रवादीशी केले. एकनाथ शिंदे यांच्या अनेक साथीदारांप्रमाणे अजित पवार यांच्या साथीदारांवर विविध आरोप होते. काही जणांवर केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाया सुरू होत्या. अजित पवार हेही ईडीच्या रडारवर होते. भुजबळ दोन-अडीच वर्षे तुरुंगात होते. जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांना ईडीची पुन्हा नोटीस आली होती. भाजपबरोबर हातमिळवणी केल्याशिवाय सुटका नाही हे लक्षात आल्यामुळे भाजपबरोबर जाण्याचा निर्णय भुजबळांनी घेतला.

भाजपबरोबर जाण्याने ईडीच्या जाचापासून सा-यांची सुटका झाली अशी भावना भुजबळ यांनी व्यक्त केली आहे. भुजबळ यांनी हा सारा तपशील राजदीप सरदेसाई यांच्या '२०२४ : द इलेक्शन दॅट सरप्राईज्ड इंडिया' या पुस्तकात नोंदवला आहे. 'हमारे साथ ईडी है' या प्रकरणात त्यांनी राज्यातील राजकारण आणि पक्ष फोडाफोडीच्या राजकारणामागील सत्य कथन केले आहे. भुजबळांचे वक्तव्य प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचे पडसाद राज्यभर उमटले. भुजबळांनी तातडीने पत्रकार परिषद घेत ईडी चौकशीमुळे नव्हे तर विकासासाठी सत्तेत सहभागी झालो अशी सारवासारव करत घूमजाव केले. आपण कसलीही मुलाखत दिलेली नाही. राजदीप सरदेसाई यांचे पुस्तक वाचलेले नाही, त्यामुळे पुस्तकात काय प्रसिद्ध झालेले आहे ते आपल्याला माहीत नाही. निवडणुकीच्या धामधुमीत लक्ष विचलित करण्याची ही कृती असेल असे भुजबळांनी म्हटले आहे.

छगन भुजबळ यांनी अशा आशयाची कोणतीही मुलाखत दिलेली नाही. निवडणुकीच्या काळात महत्त्वाचे प्रश्न बाजूला ठेवून चुकीचे कथानक रचण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशी भुजबळांची पाठराखण करताना अजित पवार यांनी तरफदारी केली आहे. छगन भुजबळ यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे तेच पुस्तकात आहे. राजकारणात मला काही रस नाही. पत्रकार, लेखक या नात्याने जी वस्तुस्थिती आहे ती मी पुस्तकात मांडली आहे. अशी प्रतिक्रिया राजदीप सरदेसाई यांनी दिली आहे. ईडीच्या चौकशीचा ससेमिरा आणि पुन्हा अटक टाळण्यासाठी भाजपच्या आश्रयाला गेलो अशी स्पष्ट कबुली भुजबळ यांनी दिली आहे. प्रफुल्ल पटेल यांची काही मालमत्ता जप्त करण्यात आली होती. अजित पवार यांच्यावरही ईडीची टांगती तलवार होती. या चौकशीत सुनेत्रा पवार यांनाही अटक होण्याची शक्यता होती.




म्हणून भाजपसोबत जावे आणि या चौकशा थांबवाव्यात अशी गळ शरद पवार यांना घालण्यात आली होती. परंतु शरद पवार यांनी नकार दिल्याने अजित पवार यांनी बंड केले. अजित पवार गटाला भाजपने शुद्ध करून घेतले आहे हे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर स्पष्ट झाले आहे. कुठल्याही पक्षात राजकीय नेते धुतल्या तांदळासारखे नसतात हे सिद्ध झाले आहे. केंद्र सरकार सांगेल तेव्हा ईडी एखाद्या संस्थेची वा व्यक्तीची चौकशी करते अथवा चौकशी गुंडाळून ठेवते हे या निमित्ताने उघड झाले आहे. सत्तेत असलेल्या भुजबळ यांनी दबावामुळे बंड केल्याची जाहीर कबुली दिली आहे. त्यांच्या खुलाशामुळे भाजपचा आणि केंद्र सरकारचा बुरखा फाटला आहे. भुजबळ यांनी कोणताही गुन्हाच केला नसता तर त्यांना पक्ष सोडायची गरजच भासली नसती. परंतु त्यांच्या कबुलीमुळे केंद्र सरकारचेही पितळ उघडे पडले आहे. केंद्राच्या सांगण्यावरून ईडीने काही ठराविक आमदार, खासदार व मंत्र्यांवर खोटे गुन्हे दाखल केले हे उघड झाले. भुजबळ यांच्या वक्तव्यामुळे तपास यंत्रणांचा गैरवापर उघड झाला आहे.

ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग या यंत्रणांचा वापर करून विरोधकांना जेरीस आणण्याचे काम केंद्र सरकार करत आहे. अजित पवार यांच्यासह त्यांच्या पक्षाचे आमदार विकास आणि राज्याच्या हितासाठी भाजपबरोबर गेले नसून कारवाई टाळण्यासाठी सत्तेत जाऊन बसले आहेत हे उघड आहे. ईडीपासून मुक्ती मिळावी यासाठीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी अजित पवारांच्या नेतृत्वाखाली भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतला यात शंका नाही. भुजबळ यांनी साळसूदपणाचा कितीही आव आणला तरी अखेर सत्य लपून राहत नाही, उलट ते त्यांच्याच मुखातून बाहेर पडले. डोळे मिटून दूध पिल्याने जगाला ते दिसणार नाही असे वाटत असले तरी जगाला ते ढळढळीतपणे दिसत असते!

# पक्षांचा लळा, पर्यावरणवादी डॉ. सलीम

सलीम अलींचा १२ नोव्हेंबर हा जन्मदिवस पक्षी दिन म्हणून जाहीर करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरवले होते. डॉ. सलीम अली हे भारतातील आद्य पक्षिशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी होते. सलीम अली यांनी भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील पक्ष्यांचा आढळ, त्यांच्या सवयी, पक्ष्यांच्या विविध जाती आणि जातींमधील वैविध्य यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्या ह्या कार्याने भारतात हौशी पक्षिनिरीक्षक बनण्याची परंपरा चालू झाली. भारतातील हे पक्षी निरीक्षक सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांना 'बर्डमॅन ऑफ इंडिया' असे ही संबोधले जाते.

डॉ. सलीम अली आपण पक्षी निरीक्षणाकडे कसे वळलो याचे वर्णन आपल्या आत्मचरित्रात करतात. मुंबईच्या खेतवाडीमध्ये मुस्लिम कुटुंबात अली यांचा जन्म झाला. लहानपणी भेटवस्तू म्हणून दिलेल्या छर्‍याच्या बंदुकीने लहान पक्षी टिपायचे हा त्यांचा छंद होता. एके दिवशी टिपलेल्या चिमण्यांमध्ये त्यांना वेगळी चिमणी मिळाली. हिच्या गळ्यापाशी पिवळा ठिपका होता. नेहेमीपेक्षा हा पक्षी वेगळा दिसल्याने त्यांची उत्सुकता चाळवली व त्यांनी त्यांच्या मामांकडे हा पक्षी कोणता याची विचारणा केली. मामा त्याला थट बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या संचालकांकडे घेऊन गेले. तेथे संचालकांनी छोट्या अलीला हा पक्षी कोणता हे सविस्तर सांगितले, तसेच भुसा भरलेल्या पक्ष्यांचा संग्रह दाखवला. भारावललेल्या सलीम अलींना पक्ष्यांची जी भुरळ पडली ती कायमचीच.

यानंतरच्या काळात सलीम अलींचा पक्षिछंद त्यांना टिपणे व नोंदी करणे यापुरता मर्यादित राहिला. शालेय शिक्षणानंतर त्यांना प्राणी शास्त्रात पदवी घ्यायची होती परंतु शास्त्रातील अनेक अवघड विषयांमुळे माघार घ्यावी लागली. दरम्यान ते ब्रम्हदेशातील आपल्या बंधूंच्या धंद्याला मदत म्हणून रंगूनला गेले. तेथे धंद्यात मदतीसोबत त्यांनी ब्रम्हदेशातील जंगले फिरून पक्ष्यांना टिपून त्यांच्या नोंदी ठेवायचा छंद चालू ठेवला. १९१८ मध्ये त्यांचा तेहमिना यांच्यांशी विवाह झाला. एका यशस्वी पुरुषामागे पत्नीचा हात असतो ही म्हण सलीम अलींच्या बाबतीत तंतोतंत लागू होते. १९२४ मध्ये रंगून मधील धंद्यात अपयश आल्यानंतर अली भारतात परत आले. दरम्यान तेहमिना यांनी सलीम अलींचा पक्ष्यांबद्दलचा कल जाणून घेतला होता व ज्यात त्यांचा छंद जोपासला जाईल अशी नोकरी करण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. परंतु सलीम अलींचे शिक्षण अशी नोकरी मिळवण्यास एकदम जुजबी होते. जवळच्या ओळखीने त्यांना बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी मध्ये गाईड लेक्चररची नोकरी मिळाली, परंतु अलींना ते पुरेसे नव्हते. त्यावेळेस भारतात पक्षीशास्त्र हा विषय अस्तित्वातच नव्हता. यासाठी त्यांनी जर्मनीमध्ये जाऊन पक्षिशास्त्राचे प्रशिक्षण घेतले व काही काळ इंग्लंडमध्ये काम केले.

भारतात आल्यानंतर या विषयात नोकरी मिळणे कठीण काम होते. सलीम अली अजूनही हौशी पक्षी निरीक्षकांसारखेच गणले जात. आर्थिक परिस्थिती खालावल्याने त्यांनी आपल्या पत्नीच्या मदतीने अलिबागजवळ किहीमजवळ आपला मुक्काम हलवला. या मुक्कामात त्यांनी सुगरण पक्ष्याच्या वर्तनावर अतिशय बारकाईने अभ्यास केला व त्यावर 'बीएनएच्एस'च्या जर्नलमध्ये त्यांनी प्रदीर्घ शोधनिबंध लिहिला. हा निंबध त्यांना पक्षीशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळवून देण्यास जबाबदार ठरला. त्यांनी पक्ष्यांना केवळ टिपून त्यात भुसा भरून संग्रहालयात ठेवण्यासाठी पक्षिशास्त्र नाही हे जगाला दाखवून दिले व एकूणच पक्षीशास्त्रालाच वेगळी दिशा दिली.

यानंतर १९३० च्या सुरुवातीला सलीम अलींना ब्रिटिश सरकारपुरस्कृत तसेच संस्थाने पुरस्कृत पक्षी मोहिमांवर बोलवणे येऊ लागली. अलींनी या मोहिमांवर आपण नोंदी तसेच पक्ष्यांचा जीवनशैलींवर अभ्यास करणार असल्याचे स्पष्ट केले, केवळ पक्षी टिपून नोंदी ठेवण्यात आपल्याला रस नाही, ते काम कोणीही स्थानिक कामगार करू शकेल असे स्पष्ट केले. आता सलीम अली सर्वमान्य पक्षी शास्त्रज्ञ झाल्यामुळे तत्कालीन ब्रिटिश अधिकार्‍यांनी मंजूरी दिली व सलीम अलींचे पक्ष्यांचे खरेखुरे काम सुरू झाले. या नंतरच्या काळात भारताच्या मोठ्या भूभागावर त्यांनी पक्षी निरीक्षण मोहिमा आखल्या. देशाच्या वायव्य सरहद्दीपासून ते केरळच्या जंगलांपर्यंत तसेच कच्छच्या दलदलीपासून पूर्वेकडे सिक्कीम व अरुणाचलपर्यंत जाऊन त्यांनी पक्ष्यांच्या नोंदी केल्या. पक्ष्यांचे वर्तन, त्याच्यांत हवामानानुसार होणारे बदल, स्थलांतराच्या सवयी, विणीचे हंगाम यावर मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा केली. सुरुवातीला या कामी त्यांची पत्नी तेहमिनाने खूप मदत केली. त्याच सलीम अलींच्या मोहिमांचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट बघत. १९३९ मध्ये तेहमिनांचा मृत्यू झाल्यानंतर अली खूपच व्यथित झाले. त्यांच्या आयुष्यात खूप मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु त्यातून सावरून पुन्हा लग्न न करता त्यांनी आपले आयुष्य पूर्णपणे पक्ष्यांना वाहून देण्याचे ठरवले. आपला मुक्काम मुंबईला बहिणीच्या घरी हलवला व तेथूनच आपले उर्वरित आयुष्य घालवून भारतीय पक्षिशास्त्रासाठी अजरामर ठेवा निर्माण केला.

सलीम अलींचे पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मोठेपण कशात आहे तर त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके. भारतभर फिरून त्यांनी जी तपशीलवार माहिती गोळा केली होती, त्याचे त्यांनी केवळ रेकॉर्ड्समध्ये स्थान न ठेवता ती माहिती सर्वसामान्यांना वापरता येईल अश्या शैलीत पुस्तके लिहिली. सुरुवातीच्या काळात त्यांचे लिखाण सुधारण्यातही त्यांना तेहमिनांनी मदत केली होती. १९४३ मध्ये लिहिलेले द बुक ऑफ इंडियन बर्ड्स हे पुस्तक आजही पक्षी ओळखण्यासाठी पहिल्या पसंतीचे आहे आज हे पुस्तक १३ व्या आवृतीत असून पुस्तकातील पक्ष्यांची फारच थोडी चित्रे बदलण्यात आली आहेत. यावरून त्यांनी केलेल्या सूक्ष्म निरीक्षणांची अचूकता लक्षात येते. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ बर्ड्स ऑफ इंडिया अँड पाकिस्तान (पिक्टोरियल गाईड) या दहा खंडी पुस्तकाने त्यांना खर्‍या अर्थाने अजरामर केले. डॉ. सिडने डिलन रिप्ली यांच्या साथीदारीत त्यांनी अपार परिश्रम घेऊन भारतीय पक्ष्यांच्या १२०० जातींच्या व २१०० उपजातींच्या नोंदी, त्यांच्या सवयी वगैरे सर्वांगीण शास्त्रशुद्ध माहिती चित्रांसहित एकाच ठिकाणी उपलब्ध केली.

१९५० व ६० च्या दशकात जेव्हा भारतात पर्यावरण हा शब्द अस्तित्वातच नव्हता त्यावेळेस भरतपूरच्या केवलदेव घाना राष्ट्रीय उद्यान तसेच केरळमधील सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानात तत्कालिन होणारे पर्यावरणास हानीकारक प्रकल्पांना विरोध दर्शावला. त्यांचे वाक्य तत्कालीन पंतप्रधान चरणसिंग यांना चांगलेच झोंबले होते. ताजमहाल नष्ट झाला तर पुन्हा बांधता येईल परंतु सायलंट व्हली सारखे जंगल एकदा नष्ट झाल्यावर पुन्हा उभारता येणार नाही. त्यांनी केलेल्या शास्त्रीय वादावर सरकारने नमते घेउन इंदिरा गांधी सरकारने हे प्रकल्प स्थगित केले तसेच अंततः त्यांना राष्ट्रीय उद्यानांचा दर्जा देउन कायमचे संरक्षित केले. तसेच अनेक दुर्मिळ प्राणी व पक्षी यांबाबत आपल्या पुस्तकांद्वारे, संस्थेद्वारे, शिष्यांमार्फत केलेले सरकार तसेच सामान्य नागरिकांमध्ये केलेले प्रबोधन भारतातील पर्यावरण चळवळीचा पाया ठरले. त्यामुळेच भारतातील आद्य पर्यावरणवाद्यांमध्ये डॉ. सलीम अली यांचा समावेश होतो. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त सर्वांना राष्ट्रीय पक्षी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

***

(Praveen M. Bagde)
Cell No. 099236 20919

# संत गोपाळबुवा महाराज स्वाभिमानी शेतकऱ्यांचा हक्काचा साखर कारखाना- चेअरमन राजेश कराड

## डसेंबर अखेर गाळप सुरू होणार; टप्प्याटप्प्याने क्षमता वाढवणार





लातूर / प्रतिनिधी : – शेतकऱ्याच्या मागणीमुळेच श्रीसंत गोपाळबुवा महाराज शुगर इंडस्ट्रीजच्या माध्यमातून साखर कारखान्याची उभारणी केली असून हा कारखाना स्वाभिमानी शेतकऱ्यांच्या हक्काचा कारखाना आहे. येत्या डिसेंबर अखेर प्रत्यक्ष गाळपास सुरुवात होईल आणि गरजेनुसार टप्प्याटप्प्याने गाळप क्षमता वाढविण्यात येईल असे कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी रोलर पूजन कार्यक्रमात बोलून दाखविले.

लातूर तालुक्यातील दिंडेगाव रोडवर मौजे रामेश्वर परिसरात उभारलेल्या श्री संत गोपाळबुवा महाराज शुगर अँड फूड इंडस्ट्रीजच्या साखर कारखान्याचा रोलर पूजनाचा कार्यक्रम हभप श्री बाबा महाराज बोराडे काटगावकर, हभप श्री नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, ह भ प श्री लालासाहेब पवार यांच्या शुभहस्ते मंगळवारी सकाळी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी जेष्ठ मार्गदर्शक अँड बळवंतराव जाधव, कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीरामअण्णा कराड, प्रगतशील शेतकरी काशीरामनाना कराड, चेअरमन राजेश कराड, कार्यकारी संचालक थोरबोले, ऋषिकेशदादा कराड, भागवत सोट, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, दशरथ सरवदे, बन्सी भिसे, गोविंद नरहरे, हनुमंतबापू नागटिळक, सतीश आंबेकर, अनंत चव्हाण, वैभव सापसोड, वसंत करमुडे, गोपाळ पाटील, सुरज शिंदे, बापूराव चांमले, विजय काळे, साहेबराव मुळे, विजयकुमार मलवाडे, भैरवनाथ पिसाळ, प्रताप पाटील, पांडुरंग बालवाड, अजय गुडे, रशीद पठाण, ललिता कांबळे, लता भोसले, अनुसया फड, जनाबाई साखरे, शीला आचार्य, सुनिता माडजे योगीराज साखरे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने अडचणीत, संकटात सापडत असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या आग्रहाच्या मागणीमुळेच श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर अँड फूड इंडस्ट्रीजच्या माध्यमातून साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली. कारखाना उभारणीचे काम प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता यावे यासाठीच रोलर पूजनासाठी सर्वांना निमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती देऊन चेअरमन राजेश कराड म्हणाले की, या कारखान्याचे दिवाळी पूर्वीच काम होणे अपेक्षित होते मात्र यावर्षी सतत चांगला पाऊस झाल्याने कारखान्याची कामे वेळेत पूर्ण झाली नाहीत तरीही डिसेंबर अखेर कारखान्याचे प्रत्यक्ष गाळप सुरू होईल. हा कारखाना प्रतिदिन सोळाशे टन गाळप क्षमतेचा आहे गरजेनुसार टप्प्याटप्प्याने गाळप क्षमता वाढवण्याचे नियोजन उभारणीत करण्यात आले आहे.

भादा सर्कल सह लातूर – रेणापूर तालुक्यातील शेतकरी ऊस उत्पादकांना न्याय देण्यासाठी त्यांच्या हक्काच्या स्वप्नातील कारखाना उभा राहिला असून या कारखान्याचा निश्चितपणे इतरांपेक्षा अधिक ऊसाला भाव असेल. उसाचे वजन कुठेही करून आणले तरी कारखान्याच्या वजन काट्यात फरक दिसणार नाही शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक केली जाईल, सर्वांना सन्मानाची वागणूक दिली जाईल असेही राजेश कराड यांनी बोलून दाखवले.

यावेळी बोलताना अँड. बळवंतराव जाधव म्हणाले की, कराड कुटुंब हे कुण्या एका जातीचे नाहीत तर शेतकरी हीच त्यांची जात आहे. शेतकऱ्याचा स्वाभिमान जिवंत ठेवण्यासाठी संत गोपाळबुवा हा हक्काचा कारखाना उभा राहिला आहे. आता कुणाला भिण्याची गरज नाही आणि शेतकऱ्याला लुटणाऱ्यांना माफी नाही सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे कारखाने असताना नोकरासारखी वागणूक देत आहेत याबाबतीत योग्य तो निर्णय शेतकऱ्यांनी घेणे ही काळाची गरज आहे असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी कार्यक्रमाची प्रास्ताविक करताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, साखर कारखाना उभा रहावा हा प्रत्येकाच्या मनातील विश्वास प्रत्यक्ष कारखान्याची उभारणी करून निर्माण केला. शेतकऱ्याच्या अडचणीचे उत्तर आज डोळ्यासमोर दिसत आहे. हा कारखाना कोणाच्या मालकीचा नसून शेतकऱ्याच्या हक्काचा आहे. या कारखान्यातून शेतकऱ्याच्या हिताचे न्यायाचे काम होईल. प्रत्येक शेतकरी आमचा परिवार आहे विश्वासाचा सूर्य उगवला असून आपण सर्वजण आशीर्वाद द्याल ही अपेक्षा असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

या कार्यक्रमात भागवत सोट, पद्माकर चिंचोलकर, दशरथ सरवदे, सुरज शिंदे, गोपाळ पाटील, भैरवनाथ पिसाळ, रशीदभाई पठाण, उत्तम पवार, अशोक भिसे यांच्यासह अनेकांनी आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी महेंद्र गोडभरले यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास रेणापूर लातूर तालुक्यासह भादा सर्कल मधील गावागावातील वाडी वस्तीतील शेतकरी ऊस उत्पादक भागधारक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासाचा डोंगर उभारणाऱ्या ना.संजय बनसोडे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा : माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा




उदगीर / प्रतिनिधी :– विकासाचा सूक्ष्म आराखडा तयार करून पाच वर्षात उदगीर मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेवुन जाण्याचे काम राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी केले आहे. विकासाचा हा डोंगर उभा करून या भागातील सामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या ना. बनसोडे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुबा यांनी केले. उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ येथील उदगीर शहरातील रघुकुल मंगल कार्यालयात माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुब्बा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्नेह सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

यावेळी भाजपाचे निवडणूक प्रभारी हरीश कोटवाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. व्यंकट बेद्रे, माजी उपसभापती रामराव बिरादार,प्रदेश सरचिटणीस समीर शेख, अ‍ॅड. बस्वराज पाटील कौळखेडकर, वीरशैव समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, बस्वराज रोडगे, सुधीर भोसले, उत्तरा कलबुर्गे, श्रध्दा जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, बिरादार, महाराष्ट्र बसव परिषदेचे माजी जिल्हाध्यक्ष कुणाल बागबंदे, यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना खुबा म्हणाले की, उदगीर मतदार संघात ना. संजय बनसोडे हे मंत्री झाल्यापासून मोठा बदल झाल्याचे पहावयास मिळत आहे. या मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हाच ध्यास घेऊन निघालेले ना. बनसोडे यांनी मागच्या पाच वर्षात मतदार संघातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती व्हावी म्हणून कोल्हापुरी बंधारे व तिरू नदीवर बॅरेजची उभारणी करून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणली आहे. शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून महायुती सरकारने अल्प दरामध्ये पिक विमा शेतकऱ्यांची वीज बिल यासह विविध कल्याणकारी योजना राबवले आहेत. ना.बनसोडे यांनी विविध प्रशासकीय इमारतीसह रस्ते, वीज, पाणी आणि आरोग्याचे प्रश्न सोडवले असुन सर्व जाती धर्मातील समाज घटकांना न्याय दिला आहे. लिंगायत समाजाला वीरशैव लिंगायत भवन, चौकी मठाला निधी, श्री रेणुकाचार्य संस्कार भवनाला निधी उपलब्ध करुन दिला. श्री हावगीस्वामी मठाचा विकास केला. जातीधर्माच्या पलीकडे जाऊन विकास करणारे हे नेतृत्व असून अशा नेतृत्वाला जपण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधकांकडून आपल्या समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याला बळी न पडता सर्वांनी विकासासाठी एकदिलाने ना.संजय बनसोडे यांच्या पाठीशी उभे रहावे असे आवाहन यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुब्बा यांनी केले. यावेळी महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# केज विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये दुरंगी लढत





केज/प्रतिनिधी :–केज विधानसभेच्या प्रचारात महाविकास आघाडी व महायुती आघाडीवर तर मनसेचे इंजन पिछाडीवर असल्याचे मतदारातून बोलले जात आहे केज विधानसभेची निवडणूक ही तिरंगी लढत होणार असे वाटले होते परंतु केज विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये दुरंगी लढत होत असल्याचे मतदारसंघांमध्ये पाहावयास मिळत आहे व तशा मतदारांतून चर्चा देखील ऐकण्यास मिळत आहेत. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना दिवसांनी दिवस मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळताना दिसत आहे. पृथ्वीराज साठे हे गेले पाच वर्षापासून सतत केज मतदार संघातील गावागावात त नागरिकाशी संवाद साधत असल्यामुळे त्यांचा जनसंपर्क मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्यासोबत खासदार रजनीताई पाटील, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, डॉ.नरेंद्र काळे,माजी आमदार संगीताताई ठोंबरे, जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सीताताई बनसोड, शेकापचे भाई मोहन गुंड,डॉ. अंजली घाडगे यांच्यासह शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी व काँग्रेसचे पदाधिकारी यांच्यासह महा विकास आघाडीतील घटक पक्ष सोबत आहे. तसेच पृथ्वीराज साठे यांना बऱ्याचशा अपक्ष उमेदवार यांनी देखील पाठिंबा दिलेला आहे आणि सर्वसाधारण नागरिक त्यांच्या सोबत आहे.

महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते व त्यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा हे एक हाती प्रचाराची धुरा सांभाळताना पाहावयास मिळत आहे.

नमिता मुंदडा व त्यांच्या कुटुंबावर भाजपातील एक गट नाराज असल्याचे दिसून येत होते परंतु नुकतीच भाजपाच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांनी नाराज कार्यकर्त्याची बैठक घेऊन त्यांचे नाराजी दूर केली आहे. नमिता मुंदडा यांनी गेल्या पाच वर्षात केलेल्या विकासाच्या जोरावर त्या मतदारसंघातील गावोगाव जाऊन मतदान मागत आहेत व मतदारांशी चर्चा करून संवाद साधत आहेत. त्यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश गालफाडे यांनी प्रचाराचा नारळ हा त्यांच्या जन्मभूमी साळेगाव येते फोडून प्रचारास प्रारंभ केला आहे रमेश गालफाडे हेही मतदारसंघातील गावागावात जाऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत परंतु त्यांना फारसा मतदारातून पाठिंबा मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे व नागरिकांतून चर्चाही ऐकण्यास येत आहे. रमेश गालफाडे हे साळेगावचे भूमिपुत्र असले तरी ते वास्तव्यास पुणे येथे असतात व ते एक मोठे व्यावसायिक आहेत. रमेश गालफडे संघटनेच्या माध्यमातून मतदार संघात अधून मधून तुरळक प्रमाणात कार्यक्रम घेऊन संपर्क साधत आहेत परंतु ते सतत मतदारसंघांमध्ये राहत नसल्यामुळे त्यांचा जनसंपर्क हा कमी प्रमाणात असल्याचे बोलले जात आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आजपर्यंत केव्हाच केज मतदार संघात आपला उमेदवार उभा केला नव्हता पहिल्याच वेळेस गालफाडे यांना उमेदवारी दिली आहे परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे देखील केज मतदार संघामध्ये फारसे वर्चस्व नसल्याचे बोलले जात आहे तर त्यांचे उमेदवाराचा ही संपर्क कमी प्रमाणात असल्यामुळे गालफाडे यांची प्रचारामध्ये गती असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे केज विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे व महायुतीच्या उमेदवार नमिताताई मुंदडा यांच्यात दुहेरी लढत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या प्रचाराची रणधुमाळी ही शेवटच्या टप्प्यात आलेली असताना मनसेचे इंजन पटरीवर धावताना फारसे दिसून येत नाही असे ग्रामीण भागातील व शहरी भागातील मतदारातून बोलले जात आहे परंतु खरे चित्र निकालानंतर स्पष्ट होईल हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल

# आश्वासनांचा भडिमार, शेतीच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष





किनवट/शेख शौकत

:–सध्या राज्यामध्ये विधानसभेच्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. सर्वपक्षीयांकडून मोठमोठी आश्वासने देऊन मतदारांना भूरळ पाडली जात आहे. प्रत्यक्षात शेती प्रश्नांकडे सर्वच पक्षीयांचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याने अनेक प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे. शेतमालाला भाव नाही, मजुरांच्या हाताला काम नाही. वाढती बेकारी, महागाई यामुळे अनेक समस्या आ वासून आहेत. पण या प्रश्नावर कुणीही बोलायला तयार नाही. त्यामुळे बळीराजा यावेळी काय निर्णय घेईल याचा फटका कोणत्या पक्षाला बसेल हे निकालानंतरच समजेल अशी चर्चा रंगू लागली आहे. पूर्वीचे शेतीमालाचे भाव अन् शेती उत्पादनासाठी लागणारे खते, मजुरी, औषध व इतर खर्च वाढला आहे. दहा वर्षांपूर्वी कापूस प्रति क्विंटल ७५०० रुपये विकला जात होता आजही ८ हजारांच्या आसपास भाव आहे. सन २०१३ मध्ये डीएपी खताची बॅग ५६० रुपयांना होती ती आता १४०० रुपयाला आहे. तेव्हा कापूस वेचणी ३ रुपये किलो होती आता प्रति किलो १० रुपये आहे. गॅस सिलिंडर ४०० रुपयांना होता आता ९०० रुपयांना झाला आहे. ट्रॅक्टर, ट्रॉलीची किंमत ११ लाख झाली आहे. आता कोणतीही गोष्ट सोपी व सहज घेण्यासारखी झालेली नाही. शेतकरी गहू २५ रुपये किलो विकतो तर तोच गहू व्यापारी प्रति किलो ५० रुपये विकतो. शेत मालाच्या उत्पादनासाठी लागणारा खर्च व आताचे भाव पाहता शेतकऱ्यांच्या हातात काहीच पडत नसल्याचे विदारक चित्र आहे. परंतु कोणी चिंतन करीत नाही. त्याच कोणालाही देण घेणे नाही.नेते फक्त आश्वासने व घोषणा करण्यात मश्गुल आहेत. लोकांची दिशाभूल करीत आहेत.

# भाजपच्या उमेदवार नमितताई मुंदडा यांच्या प्रचारार्थ माजी खा. प्रीतमताई मुंडे यांचा झंझावात दौरा



केज/प्रतिनिधी–भाजप पक्षाच्या केज विधानसभेच्या उमेदवार नमिताताई मुंदडा यांच्या प्रचारार्थ माजी खा.प्रीतमताई गोपीनाथरावजी मुंडे यांच्या दौऱ्याने विडा जिल्हा परिषद गटातील मतदारामध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. याबाबतची सविस्तर माहिती गेल्या काही दिवसापासून विडा सर्कलमध्ये आमदाराच्या विरोधात नाराजीचा सूर निघत होता परंतु माजी खासदार प्रीतमताई यांच्या दौऱ्यांनी सर्वांचे हेवेदावे विसरून आमदार नमिताताई मुंदडा यांच्या प्रचाराला खरी आजपासून सुरुवात झाल्याची दिसून येत आहे .

यावरून आमदार नमिताताई मुंदडा यांचा विजय निश्चित झाल्याचे मतदारातुन बोलले जात आहे. यावेळी नमिताताई मुंदडा यांनी बोलताना सांगितले की,जे विकास कामे केलेले आहेत व इथून पुढेही मी आपली सेवा करण्यासाठी मतदान रुपी आशीर्वाद मागत आहे व आपली सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले अशी भावना व्यक्त केली. तर माजी खासदार डॉ.प्रीतम ताई मुंडे यांनी बोलताना सांगितले की,लोकसभेची निवडणूक वेगळ्या वळणावर होती व आताची निवडणूक वेगळ्या वळणावर जात आहे तरी जी गेल्या वेळेस चूक झाली ती आता करू नका कारण साखळी तुटली की, विकास करण्यासाठी अडचणी निर्माण होतात जर लोकसभेत खासदार आपले असते तर विकासाला कुठेही अडचण आली नसती असे बोलताना प्रितमताईनी स्पष्ट केले.

# लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी १०० टक्के योगदान देणार – डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर

लातूर/प्रतिनिधी:लातूरचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर इथे नोकऱ्यांची संधी उपलब्ध असणे गरजेचे आहे.येथील ज्ञानाचा उपयोग लातूरकरांना झाला पाहिजे.या नोकऱ्या उपलब्ध होण्यासाठी आयटी क्षेत्रातील कंपन्या लातूरला येणे आवश्यक असून त्यासाठी १०० टक्के योगदान देणार असल्याचे प्रतिपादन भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी केले.

सांदिपनी टेक्निकल कॅम्पस व एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात आयोजित विद्यार्थी संवाद बैठकीत डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर बोलत होत्या.

एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात भाजप युवा नेते ऋषीकेशद कराड,युवामोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर,हैबतपूरकर महाराज, प्राचार्या कुलकर्णी यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर म्हणाल्या की,लातुरने शैक्षणिकक पॅटर्न निर्माण केला परंतू नोकऱ्यांच्या संधी येथे उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाने लातूर मागे राहिले. त्यामुळे येथील युवक मुंबई,पुणे, बेंगलोर आदी ठिकाणी नोकरीसाठी जातात.यापुढे असे होणार नाही.लातुरात जसा शैक्षणिक पॅटर्न निर्माण झाला तसेच नोकऱ्यांसाठी लातूरमध्ये संधी उपलब्ध करुन देण्याचे काम आम्ही पुर्ण शक्तीने करु,असे ताई म्हणाल्या.






युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की,येथील राज्यकर्ते लातुरात सुरक्षित वातावरण देऊ शकले नाहीत. गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.यावर अंकुश ठेवण्यास स्थानिक आमदार कमी पडले.त्यामुळे विकासाची दृष्टी असलेल्या भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर यांना विधानसभेत जाण्याची संधी द्यावी.लातुरात परिर्वतन होणार आहे.त्यात तरुणांनी आपला वाटा उचलून भाजपाला सहकार्य करावे,असे आवाहन कव्हेकर यांनी केले.

ऋषीकेश कराड यांनी लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे १५ वर्षांपासून नेतृत्व करणाऱ्यांनी मतदारसंघासाठी केले तरी काय ? असा प्रश्न उपस्थित केला.

हैबतपूरकर महाराजांनी सकारात्मक परिवर्तनात युवकांनी सहभागी होवून डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर यांना मतदान करण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी उपस्थित युवक – युवतींसोबत मनमोकळा संवाद साधला.त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत विद्यार्थ्यांची मने जिंकली. सांदिपनी कँपस मध्येही विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधत ताईंनी सर्वांचे मनोगत जाणून घेतले.

या संवाद बैठकीस एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय,सांदिपनी टेक्निकल कॅम्पसचे विद्यार्थी, प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

### डॉ. महावीर धर्मराज सोनवणे यांच्या रोड रोलरला मतदारांची पसंती

# केज विधानसभेच्या निवडणुकीत डॉ. महावीर सोनवणे विजयी होणार–भगवंत आप्पा वायबसे

केज/प्रतिनिधी– केज तालुक्यातील मस्साजोगचे भूमिपुत्र डॉ. महावीर धर्मराज सोनवणे यांच्या रोड रोलरला दिवसांनी दिवस केज मतदार संघात मतदारांची पसंती मिळत आहे. डॉ. महावीर सोनवणे यांनी प्रचारामध्ये भरारी घेतली आहे. केज विधानसभेची निवडणूक ही तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. केज विधानसभेच्या निवडणुकीत डॉ. महावीर सोनवणे यांचाच विजय होणार आहे असे माध्यमाशी बोलताना भगवंत आप्पा वायबसे यांनी म्हटले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, २०२४ च्या केज विधान सभेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे या निवडणुकीमध्ये प्रमुख पक्षाच्या उमेदवारासह २५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. केज विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणामध्ये अपक्ष तथा मित्र पक्ष, व विविध सामाजिक संघटनेचे,फुले–शाहू आंबेडकर चळवळीतील बौद्ध उमेदवार डॉ. महावीर धर्मराज सोनवणे हे देखील आहेत. विधानसभा निवडणुकीचा प्रचार हा अंतिम टप्प्यात असून प्रमुख पक्षाच्या उमेदवारासह डॉ. महावीर सोनवणे यांनी देखील प्रचारांमध्ये आघाडी घेतली असल्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. सोनवणे यांना केज मतदार संघातील मतदाराकडून दिवसांनी दिवस पसंती मिळत असल्याचे चित्र आता स्पष्ट होऊ लागले आहे. डॉ. महावीर सोनवणे हे त्यांच्या कार्यकर्ते व मित्र परिवारासह सर्व संघटनेतील पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन मतदार संघातील गावोगावात जाऊन



मतदारांशी संवाद साधून गाठीभेटी घेत आहेत. विद्यार्थी महिला शेतकरी युवक नागरिक यांच्या समस्या जाणून घेत आहेत त्यामुळे सोनवणे यांना मतदारांचा पाठिंबा मोठ्या प्रमाणात मिळत आहे. डॉ. महावीर सोनवणे यांच्या खांद्याला खांदा लावून भगवंत आप्पा वायबसे हे देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरून डॉ. महावीर सोनवणे यांच्या प्रचाराची धुरा त्यांच्या खांद्यावर घेऊन काम करत आहेत. माध्यमाशी बोलताना भगवंत आप्पा वायबसे म्हणाले की, केज मतदार संघ हा अनुसूचित जाती या प्रवर्गाला गेल्या अनेक वर्षापासून राखीव आहे परंतु या मतदारसंघांमध्ये कोणत्याच राजकीय पक्षांनी दलित उमेदवार दिलेला नाही. डॉ. महावीर सोनवणे हे दलित समाजाचे व या मतदारसंघाचे भूमिपुत्र आहेत डॉ. सोनवणे यांना डावी आघाडीसह दलित चळवळीतील विविध संघटनेने पाठिंबा दर्शविलेला आहे व सर्व एकदिलाने एकजुटीने डॉ. महावीर सोनवणे यांच्या पाठीशी खंबीरपणे आम्ही उभा आहोत. पुढे बोलताना वायबसे म्हणाले की.डॉ.महावीर सोनवणे यांची ही निवडणूक नसून या मतदारसंघातील बहुजनाची लढाई आहे या लढाईमध्ये सर्व बहुजन समाज एकत्र होऊन ही निवडणूक लढवीत आहे म्हणून महावीर सोनवणे यांचा विजय हा निश्चित आहे येणाऱ्या २३ नोव्हेंबर रोजी त्यांनाच गुलाल लागणार आहे असे मध्यमाशी बोलताना वायबसे यांनी स्पष्ट केले आहे. डॉ. महावीर सोनवणे यांनी प्रचारामध्ये भरारी घेतली असून व त्यांना मतदार संघामध्ये दिवसाने दिवस मतदारांचा पाठिंबा मिळत असल्यामुळे अनेकांचे टेन्शन वाढले आहे अशा चर्चा जनसामान्यातून ऐकण्यास मिळत आहेत.

## महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांचा केज विधानसभा दौरा !



केज/प्रतिनिधी – दि.१२ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार मा. श्री. पृथ्वीराज शिवाजी साठे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्ह्याचे दबंग खासदार मा.बजरंग बप्पा सोनवणे यांनी केज विधानसभा मतदारसंघातील चाकरवाडी, बाळापूर, आंबिलवडगाव, कुंभारी, पोथरा, सात्रा, सावरगाव घाट, अंधापुरी, वैतागवाडी या गावांना भेटी दिल्या यावेळी बोलताना लोकसभा निवडणुकीत सर्व जनतेने मला येवढे मतदान रुपी प्रेम दिले तसेच प्रेम या विधानसभा निवडणुकीत सुद्धा राहुद्या अशी विनंती केली व त्यांच्या विनंतीला मान देऊन या भागातील जनता मागचीच पुनरावृत्ती करणार असे येथील जनतेन आश्वासन दिले. येथील मतदारांनी खुप खुप मोठा प्रतिसाद दिला व लोकसभेच्या धर्तीवर या विधानसभा निवडणुकीत देखील मोठ्या प्रमाणात मतदान देवून मा. पृथ्वीराज साठे साहेब यांना मोठ्या मताधिक्याने निवडुन आणु असे येथील जनतेने आश्वासन दिले या दौऱ्यामध्ये सर्व मतदार बांधवाचे मा. खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आभार मानले व चाकरवाडी येथे माऊली महाराज समाधीचे दर्शन घेतले.

# माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रचार रॅलीने शहराचा पुर्वभाग महाविकास आघाडीमय

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या विजयाचा आवाज घुमला

लातूर / प्रतिनिधी :–लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी जनसंपर्क अभियाना अंतर्गत दि.११ नोव्हेंबर रोजी सांयकाळी शहरातील २, ३, ४ व ७ या भव्य प्रभागांतून भव्य प्रचार रॅली काढण्यात आली.या रॅलीला या चारही प्रभागांतील मतदारांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. पुरुष महिला युवती मोठया प्रमाणात या रॅलीत सहभागी झाले होते. युवकांची संख्या लक्षणिकय होती.प्रभाग क्रमांक ४ मधील बिलाल मस्जिद चौकात माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले.तेथून प्रचार रॅलीस सुरुवात तेथून इस्लामपूरा, मदनीचौक, सुफिया मस्जिद, तथागत चौक, हेलन चौक प्रभाग ३ मधील तुळजाभवानीनगरपासून रॅलीचा प्रारंभ झाला.जयभीमनगर, इंदिरानगर, राजीवनगर, विवेकानंद चौक, प्रभाग क्रमांक ७ मधील विवेकानंद चौकापासून जिजामाता शाळा, दसरा पार्क, सिद्धार्थ सोसायटी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, मिरकले कॉर्नर, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम चौक ते मचाले, प्रभाग क्रमांक २ मधील मचालेपासून ते कृपासदन चौक, अराफत चौक, पू.अहिल्यादेवी होळकर चौक, संविधान चौक चौकातू प्रचार रॅली एक मिनार चौक चौकात पोचल्यानंतर तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला.प्रचार रॅली मार्गावर असंख्य घरांच्या छतावरुन रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात आली, हातात फलक, झेडे घेऊन मोठया संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते नागरीक सहभागी झाले होते. लातूर शहराचा पुर्वभाग हा लातूरचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.सोमवारी सायंकाळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या निघालेल्या प्रचार रॅलीने शहराचा पुर्वभाग महाविकास आघाडीमय झाला.युवकांचा सहभाग लक्षणिय होता.'महाविकास आघाडीचा विजय असो', 'अमित देशमुख तूम आगे बढो हम तुम्हारे साथ है', अशा घोषांचा संपूर्ण परिसरात आवाज घुमला.महिला, युवती, पुरुषही मोठ्या संख्येने प्रचार रॅलीत सहभागी झाले होते.या प्रचार रॅलीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुनिल बसपूरे, शेतकरी कामगार पक्षाचे अॅड़ उदय गवारे, लातूर शहर लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सूळ, माजी नगरसेवक अहेमदखॉ पठाण, माजी नगरसेवक कैलास कांबळे, आसिफ बागवान, माजी माजी





नगरसेवक विजयकुमार साबदे, नगरसेवक सचिन बंडापल्ले, माजी नगरसेवक इम्रान सय्यद, माजी नगरसेवक युनूस मोमीन, माजी नगरसेविकास रेहाना तांबोळी, तब्रेज तांबोळी, राजू गवळी, अथरोद्दिन काजी, हकीम शेख, पृथ्वीराज सिरसाठ, अशोक गोविंदपूरकर, प्रा.प्रविण कांबळे, नामदेव इगे, बाबा पठाण, कमल मिटकरी, वर्षा मस्के, शफी शेख, अॅड़ वैभव सूर्यवंशी, मोहन माने, जीवन सूरवसे, रघूनाथ मदने, राहूल डूमणे, मोहन सूरवसे, मकबुल वलांडीकर, हरीभाऊ गायकवाड, इस्माईल शेख, विकास कांबळे, नबी नळेगांवकर आदींसह काँग्रेस, काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, महाविकास आघाडीचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, नागरिक, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.चौकट असंख्य ठिकाणी जेसीबीद्वारे फुलांची उधळण माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रचार रॅलीच्या प्रारंभीच हजारोंच्या संख्येत तिरंगी झेंडे घेऊन सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात फुलाच्या उधळणीने झाली. मदनी चौकात अहेमदखॉ युवा मंचच्या वतीने जेसीबीद्वारे भल्या मोठ्या फुलांच्या हाराने माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे स्वागत करण्यात आले.जेसीबीतून फुलांची उधळण करण्यात आली.रॅली तथागत पोचल्यानंतर तेथे पप्पूजी गायकवाड मित्र मंडळाच्या वतीने भव्य दिव्य स्वागत करण्यात आले.तुळजाभवानीनगरात मुळे परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले.प्रभाग क्रमांक ३ मध्ये काँग्रेसचे कार्यकर्ते राजू गवळी यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात पोचल्यानंतर तेथे अॅड़ आतिश चिकटे यांच्या वतीने फुलांचा मोठा हार घालून माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे स्वागत करण्यात आले.जागोजागी महिला भगिणींनी औक्षण करुन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांना आशिर्वाद दिला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE